# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# प्रादेशिक बातमीपत्र
# सकाळी 07 वाजून 10 मि

**दिनांकः06.05.2025** **वारःमंगळवार**

---

1. पहलगाम दहशतवादी हल्ल्याच्या पार्श्वभूमीवर बागलिहार धरणातून पाकिस्तानला जाणारं पाणी भारतानं अडवलं, सलाल धरणाचे दरवाजेही बंद,
2. भारत-पाकिस्तानमधील तणावाच्या पार्श्वभूमीवर उद्या मॉक ड्रिल करण्याचे केंद्रीय गृह मंत्रालयाचे सर्व राज्यांना निर्देश,
3. बारावीच्या परीक्षेत 91 पूर्णांक 88 शतांश टक्के विद्यार्थी उत्तीर्ण, कोकण विभागाची निकालात बाजी,
4. राज्य मंत्रिमंडळाची आज अहिल्यानगर जिल्हयात चौंडी इथं बैठक, आणि
5. खेलो इंडिया क्रीडा स्पर्धेत महाराष्ट्राच्या खेळाडूंची चमकदार कामगिरी; जलतरणात आदिती हेगडेची सुवर्णपदकाची कमाई

**<u>बागलिहार</u>**

पहलगाम दहशतवादी हल्ल्याच्या पार्श्वभूमीवर चिनाब नदीवरल्या बागलिहार धरणातून पाकिस्तानला जाणारं पाणी अडवण्याचा निर्णय भारतानं घेतला आहे. सलाल धरणाचे दरवाजेही बंद करण्यात आले आहेत. तसंच झेलम नदीवरल्या किशनगंगा धरणाचं पाणी रोखण्याचा विचारही भारत करत असल्याचं आकाशवाणीच्या वार्ताहरानं कळवलं आहे. गेल्या 22 एप्रिलला पहलगाम इथं झालेल्या दहशतवादी हल्ल्यात 26 नागरिक मृत्युमुखी पडले होते. त्यानंतर भारतानं पाकिस्तानसोबतचा सिंधु पाणीवाटप करार रद्द करण्याचा निर्णय घेतला होता. 1960मध्ये हा करार करण्यात आला होता. या करारामुळे जवळजवळ निम्या पाकिस्तानला पाणीपुरवठा केला जातो. बागलिहार धरणावरून भारत आणि पाकिस्तानमध्येही गेल्या अनेक वर्षापासून वाद आहे.

**<u>मॉक ड्रिल</u>**

पहलगाम दहशतवादी हल्ल्यानंतर भारत आणि पाकिस्तानमधील तणावाच्या पार्श्वभूमीवर युद्धजन्य परिस्थितीची शक्यता गृहीत धरून सुसज्ज राहण्याच्या उद्देशानं केंद्रीय गृह मंत्रालयानं सर्व राज्यांना उद्या म्हणजे सात मे रोजी, मॉक ड्रिल म्हणजेच युद्ध सज्जता सराव करण्याचे आदेश दिले आहेत. हवाई हल्ल्याच्या वेळी वाजवला जाणारा सायरन वाजविण्याच्या सूचनाही देण्यात आल्या आहेत. हवाई हल्ला होण्याची शक्यता गृहीत धरून हा सराव करण्यात यावा, तसंच नागरी सुरक्षिततेचं महत्त्व लक्षात घेऊन विद्यार्थीवर्गासह नागरिकांना सुरक्षिततेचं प्रशिक्षण द्यावं, असंही गृहमंत्रालयानं या आदेशामध्ये म्हटलं आहे.

**<u>सुनावणी</u>**

वक्फ सुधारणा कायदा 2025 च्या घटनात्मक वैधतेला आव्हान देणाऱ्या याचिकांवर आता येत्या 15 मे रोजी सर्वोच्च न्यायालयात सुनावणी होणार आहे. सरन्यायाधीश न्यायमूर्ती संजीव खन्ना यांच्यासह न्यायमूर्ती संजय कुमार आणि न्यायमूर्ती के व्ही विश्वनाथन यांच्या खंडपीठासमोर काल सुनावणी होणार होती. मात्र आपण लौकरच सेवानिवृत्त होणार असल्यानं ही सुनावणी भावी सरन्यायाधीश भूषण गवई यांच्या पीठासमोर होईल, असं सांगून न्यायमूर्ती संजीव खन्ना यांनी पुढची तारीख दिली आहे.

**<u>बारावी निकाल</u>**

राज्य माध्यमिक आणि उच्च माध्यमिक शिक्षण मंडळानं यावर्षी फेब्रुवारी आणि मार्च महिन्यात घेतलेल्या इयत्ता बारावीच्या परीक्षेचा निकाल काल जाहीर झाला. ऐकूया त्याविषयीची अधिक माहिती आमच्या प्रतिनिधीकडून.....

**बारावीच्या परीक्षेसाठी यंदा राज्यातील नऊ विभागीय मंडळातून 14 लाख 17 हजार 969 विद्यार्थी बसले होते, त्यापैकी 13 लाख 2 हजार 873 जण उत्तीर्ण झाले आहेत. गेल्यावर्षी पेक्षा वर्षी 1 पूर्णांक 49 टक्क्यांनी निकाल घटला आहे. या परीक्षेत मुलींच्या उत्तीर्णतेचे प्रमाण अधिक असून त्याची टक्केवारी 94 पूर्णांक 58 टक्के इतकी आहे. तर 89 पूर्णांक 51 टक्के इतकी मुलं उत्तीर्ण झाली आहेत. यंदा कोकण विभागाची उत्तीर्णतेची टक्केवारी सर्वाधिक असून यात 96 पूर्णांक 74 टक्के विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत, तर सर्वात कमी निकाल हा लातूर विभागाचा असून त्याची टक्केवारी 89 पूर्णांक 46 टक्के इतकी आहे. शाखानिहाय निकालात यंदा विज्ञान शाखेच्या विद्यार्थ्यांचे उत्तीर्णतेचे प्रमाण सर्वाधिक असून यात 97 पूर्णांक 35 टक्के विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत. अनुत्तीर्ण विद्यार्थ्यांसाठी मंडळाकडून येत्या जून आणि जुलै दरम्यान पुरवणी परीक्षा आयोजित करण्यात येणार आहे. तसेच या परीक्षेत अनुत्तीर्ण विद्यार्थ्यांना गुण पडताळणीसाठी आजपासून ते 20 मे दरम्यान अर्ज करता येणार आहे. आकाशवाणी बातम्यांसाठी संतोष गोगले, पुणे.**

**<u>विद्यार्थ्यांसाठी समुपदेशन</u>**

बारावीच्या निकालानंतर काही विद्यार्थी नकारात्मक विचारातून मानसिक दडपणाखाली येण्याची शक्यता असते. अशा विद्यार्थ्यांना नैराश्यातून बाहेर काढण्यासाठी राज्य मंडळातर्फे ऑनलाइन समुपदेशन सेवा दिली जाते. यासाठी मंडळाच्या अधिकृत संकेतस्थळावर मोबाइल क्रमांक जाहीर करण्यात आले आहेत.

**<u>टेकवारी</u>**

'राजकीय कार्यसंस्कृती सक्षम करण्यासाठी शासकीय कर्मचाऱ्यांचं मोठं योगदान असून टेकवारी उपक्रमामुळे राज्यातलं शासकीय मनुष्यबळ अधिक तंत्रकुशल, गतिमान, पारदर्शक आणि जबाबदार होईल', असा विश्वास उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी काल व्यक्त केला. टेक वारी-महाराष्ट्र टेक लर्निंग वीकचं काल त्यांच्या हस्ते उद्घाटन झालं, तेव्हा ते बोलत होते. प्रशासकीय अधिकारी-कर्मचारी यांच्या कौशल्य विकासासाठी, प्रशिक्षण संस्कृती निर्माण करण्यासाठी टेक वारी हा प्रशिक्षण आठवडा कालपासून येत्या 9 मे दरम्यान साजरा करण्यात येणार आहे. काल पहिल्या दिवशी 'प्रभावी आणि तणावमुक्त जीवन' या विषयावर प्रभू गौर गोपालदास यांनी मार्गदर्शन केलं. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीत 9 मे रोजी या कार्यक्रमाचा समारोप होणार आहे.

**<u>बैठक-अहिल्यानगर</u>**

राज्य मंत्रिमंडळाची बैठक आज पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांचं जन्मगाव असलेल्या अहिल्यानगर जिल्ह्यातील चौंडी इथं होत आहे. ऐकूया त्याविषयीची अधिक माहिती आमच्या प्रतिनिधीकडून....

**पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या त्रिशताब्दी वर्षाच्या निमित्ताने पहिल्यांदाच राज्य मंत्रिमंडळाची बैठक अहिल्यादेवी होळकर यांच्या जन्मगावी म्हणजेच चोंडी येथे होत आहे. या बैठकीच्या निमित्ताने राज्याचं संपूर्ण मंत्रिमंडळ चोंडी या ठिकाणी येत आहे. राज्य सरकारने या बैठकीची तयारी पूर्ण केली असून मोठा पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात आला आहे. चोंडी येथील कार्यक्रमाबरोबरच अहिल्यानगर मध्ये भारतीय जनता पार्टीच्या कार्यालयाचे भूमिपूजनही मुख्यमंत्र्यांच्या हस्ते होत आहे.विधान परिषदेचे सभापती प्राध्यापक राम शिंदे यांच्या संकल्पनेतून ही मंत्रीमंडळ बैठक या ठिकाणी होत असून अहिल्याबाई होळकर यांच्या त्रिशताब्दी वर्षाच्या निमित्ताने चोंडी येथील विकास आराखड्याचा प्रश्न या निमित्ताने मार्गी लागण्याची अपेक्षा आहे. तसेच अहिल्यानगर जिल्ह्यातील विविध प्रश्न या बैठकीत मांडण्यात येणार आहेत. त्यामुळे राज्याच्या हिताच्या निर्णयाबरोबरच अहिल्यानगर जिल्ह्यातील नागरिकांचे हिताचे निर्णय यानिमित्ताने व्हावेत अशी येथील नागरिकांची अपेक्षा आहे. आकाशवाणी बातम्यांसाठी मनोज सातपुते अहिल्यानगर.**

**<u>बावनकुळे</u>**

'पुरंदर विमानतळासाठी शेतकऱ्यांनी जमीन देण्यास नकार देण्याऐवजी आपल्या मागण्या सरकारकडे सात दिवसांत मांडाव्यात, त्यांना सर्वोत्तम मोबदला देण्यास सरकार तयार आहे', असं महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी काल सांगितलं. कोणत्याही स्वरूपाचा अन्याय सरकार शेतकऱ्यांवर करणार नाही. या विमानतळामुळे पश्चिम महाराष्ट्राच्या विकासाला चालना

तसंच स्थानिक तरुणांच्या हाताला काम मिळेल, अशी ग्वाही त्यांनी दिली. पुणे जिल्ह्यातील पुरंदर इथल्या प्रस्तावित आंतरराष्ट्रीय विमानतळाच्या भूसंपादनाच्या संदर्भात पुणे जिल्हाधिकारी कार्यालयात संबंधित सात गावातील शेतकऱ्यांसोबत बावनकुळे यांनी सुमारे दोन तास चर्चा केली. त्यांचं म्हणणं समजून घेतलं. त्यानंतर ते बोलत होते. यावेळी आमदार विजय शिवतारे, जिल्हाधिकारी जितेंद्र डूडी आणि या प्रकल्प क्षेत्रातील भूसंपादन अधिकारी उपस्थित होते.

**<u>निधन-सिंधुदुर्ग</u>**

सिंधुदुर्ग महिला आणि बाल रुग्णालयातील वैद्यकीय अधिष्ठाता डॉ. प्रमोद वालावलकर यांचं काल संध्याकाळी राहत्या घरी दुर्धर आजारानं निधन झालं. ते 58 वर्षांचे होते. आपल्या निरपेक्ष सेवेने त्यांनी सिंधुदुर्ग जिल्ह्यातील रुग्णांच्या मनात आदराचं स्थान निर्माण केलं. त्यांच्या निधनानं वैद्यकीय क्षेत्रातलं एक सेवाभावी व्यक्तिमत्व हरपल्याची भावना व्यक्त होत आहे. वैद्यकीय सेवेबरोबरच फुटबॉल खेळावरदेखील त्यांचं प्रेम होतं.

**<u>खेलोइंडिया</u>**

सातव्या खेलो इंडिया क्रीडा स्पर्धेत जलतरणात आदिती हेगडे हिने सुवर्णपदक पटकावत महाराष्ट्रासाठी पदकांचं खातं उघडलं. जलतरण क्रीडा प्रकारात महाराष्ट्राच्या खेळाडूंनी एक सुवर्ण एक रौप्य आणि पाच कास्य अशी सात पदकं मिळवली. तिरंदाजीसह मल्लखांब प्रकारातही महाराष्ट्राच्या खेळाडूंनी सुवर्णपदकाकडे वाटचाल कायम राखली आहे. तिरंदाजीत महाराष्ट्राचे सात खेळाडू पदकासाठी भिडणार असून, यातील सहा पदके, निश्चित आहेत. मल्लखांबमध्येही सांघिक प्रकारात मुलांनी आघाडी घेतली आहे. खोखोमध्ये पंजाबचा 58 विरुद्ध 9 अशा गुणांनी धुव्वा उडवून महाराष्ट्राच्या मुलींनी विजयी सलामी दिली.

**<u>आयपीएल</u>**

आयपीएल क्रिकेट स्पर्धेतील दिल्ली कॅपिटल्स आणि सनरायझर्स हैदराबाद यांच्यातील सामना काल पावसामुळे रद्द करण्यात आला. दोन्ही संघांना एक-एक गुण मिळाला. सनरायझर्स हैदराबादचा संघ स्पर्धेतून बाहेर पडला आहे. आज वानखेडे मैदानावर मुंबई इंडियन्सचा सामना गुजरात टायटन्सशी होणार आहे.

**<u>पाऊस</u>**

राज्यात काल अनेक ठिकाणी गारपिटीसह अवकाळी पावसानं हजेरी लावली. जालना, नाशिक, अहिल्यानगर, वाशीम, परभणी, बीड, हिंगोली, लातूर या जिल्ह्यांमध्ये या पावसानं गरपीटीसह हजेरी लावल्याचं आमच्या प्रतिनिधींनी कळवलं आहे. काही भागात या पावसानं आंबा, कांदे या पिकाचं नुकसान झालं आहे.

**<u>हवामान</u>**

येत्या चोवीस तासात राज्यातल्या चारही विभागांमध्ये तुरळक ठिकाणी पाऊस पडण्याची शक्यता पुणे वेधशाळेनं वर्तवली आहे. तुरळक ठिकाणी मेघगर्जनेसह विजांचा कडकडाट आणि सोसाट्याचा वारा वाहण्याची शक्यता आहे.

## आकाशवाणी पुणे केंद्रावरचं प्रादेशिक बातमीपत्र संपलं, नमस्कार.